भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७२४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २२/१०/२०१७

**१)महिलेचा विनयभंग करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०४/१०/२०१७ चे २०.०० वा. दरम्यान यातील आरोपीने फिर्यादीचे घरात प्रवेश करून फिर्यादीचा विनयभंग करून शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३५४(अ)(१)(ब),३२३,५०४,५०६,४५२ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोउपनी. आतराम पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**२) पैशाच्या कारणा वरून जिवाने ठार मारण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २०/१०/२०१७ चे १७.३० वा. दरम्यान यातील आरोपी याने फिर्यादीचे पतीला आरोपीकडे असलेले पैसे का मागीतले, या कारणा वरून फिर्यादीचे पतीला डाव्या कुशीत, डावे हातावर व उजव्या खांदयावर मारून जखमी केले, व जिवाने ठार मारण्याचा प्रयत्न केल्याने, फिर्यादी सौ. दुर्गा डिगेश्वर येडेकर वय २३ वर्ष रा. सिंधीपार/ मुंडीपार हिचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३०७ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. पुसाटे पो.स्टे लाखनी हे करीत आहेत.

**३) बॅटरीची चोरी :–**

दिनांक २०/१०/२०१७ चे १८.०० ते २२.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीने त्याचे शेताजवळील नहरावर शेतीला पाणी देण्याकरीता ट्रॅक्टर क्र. एमएच ३६ एल ०६०२ वर इंजीन लावुन शेतात पाणी देत असतांना कोणीतरी अज्ञात आरोपीने ट्रॅक्टर ला लावलेली टाटा ग्रिन कंपनीची बॅटरी कि. ३,०००/रु ची चोरून नेल्याने फिर्यादी ज्योतीपाल डोमाजी सुखदेवे वय ५७ वर्ष रा.परसोडी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३७९ भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. कांबळे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**४) टेस्टरने कपाळावर मारून महिलेला जखमी केल्याने गुन्हा नोंद:–**

दिनांक २०/१०/२०१७ चे १९.०० वाजता दरम्यान यातील आरोपीने फिर्यादी पत्नी ला तुला लोंकानी साडया घेवुन दिल्या आहेत, अशा प्रकारे तिचे चारीत्रावर संशय घेवुन तीला टेस्टरने कपाळावर मारून जखमी केल्याने फिर्यादीचे तोंडीव डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२४ भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. टेंभुर्नीकर पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**५) अज्ञात वाहनाच्या धडकेत दोन जखमी:–**

दिनांक २१/१०/२०१७ चे १७.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी जखमी सौ. सत्वशिला भिमराव बागडे वय ३० वर्ष रा. पंचशील नगर नागपुर ही तीचा मित्र मोहम्मद आरीफ शेख वय ३५ वर्ष रा. नागपुर याचेसह ॲक्टीव्हा स्कुटी क्र. एमएच ४९ क्यु ८७३४ ने भंडारा कडुन नागपुरला एनएच ६ रोडने जात असता, यातील अज्ञात आरोपी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपने चालवुन जखमीच्या मोटार सयकलला मागेहुन धडक देवुन फिर्यादी व तिचा मित्र यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने, व अपघाताची सुचना न देता पडुन गेल्याने सरतर्फे फिर्यदी पोना. सार्वे .यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३७, भादवी सहकलम १८४,१३४ (ब)/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. कडव पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

६) महेन्द्रा बोलेरो गाडीच्या धडकेत दोन जखमी :–

दिनांक २१/१०/२०१७ चे १२.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही त्याचे मोटार सायकल क्र. एमएच ३६ जे एफ ७९५८ ने मोहाडी कडुन आधंळगाव कडे येत असतांना डोंगरगाव येथील राईस मिल समोर यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे मोटार सायकला धडक मारून फिर्यादी व तीचे सोबत असलेली सौ. लक्ष्मी देशमुख वय ३५ वर्ष व प्रतिक देशमुख वय ०७ वर्ष यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पडुन गेल्याने फिर्यादी कु. प्रिती दशरथ गायधने वय २७ वर्ष रा. आंधळगाव यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २७९,३३७, भादवी सहकलम १३४ (ब),१८४,११९/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बाबरे पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

७) अंधाराचा फायदा घेवुन अस्तित्व लपवुन चोरी करण्याच्या उद्देशाने मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक २१/१०/२०१७ चे ०३.०० वाजता दरम्यान यातील आरोपी हा बेला येथील रामकृष्ण वसंता सेलोकर यांचे घराचे मागिल भागात अंधाराचा फायदा घेवुन त्याचे अस्तित्व लपवुन चोरी करण्याचा उद्येशाने दस्तंदाजी करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा रामटेके, यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम १२२ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पोउपनी.थेर पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.अरोपी अटक आहे.

८) सार्वजनीक ठिकाणी वाहन थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस अडथडा व लोंकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक २१/१०/२०१७ चे ०६.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन ऑटो वाहन ही आम रोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत वाहन उभी करतांनी मिळुन आल्याने, पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रामटेके पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

९) विहीरीच्या पाण्यात बुडुन इसमाचा मृत्यु :–

दिनांक १७/१०/२०१७ ते दि. २१/१०/२०१७चे ०८.३० वाजता दरम्यान यातील मृतक राजेश हन्सादास बोरकर वय २५ वर्ष रा. खापरी हा दारू पाणी पिण्याच्या सवईचा असुन तो गावी ग्रामपंचायत निवडणुक करीता मतदान करण्याकरीता आला होता, तो नमुद घटना तारखे दरम्यान दारू पाणी पिऊन त्याचे घराजवळील विहीरीवर बसला असतांना त्याचा तोल जावुन तो विहीरीत पडुन मरण पावल्याने, फिर्यादी हन्सादास नागोजी बोरकर वय ६५ वर्ष रा. खापरी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. चाबुकस्वार पो.स्टे पवनी हे करीत आहेत.

१०) अवैध दारू अंडयावर धाडी . :–

दिनांक २१/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन तुमसर येथे अवैध दारू अंडयावर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून ०९ लिटर हातभट्टी दारू किंमती ९००/–रु चा माल जप्त करण्यात आला.

११) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :

दिनांक २१/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ५३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी ०१, तीन सिटर वाहनांवरती १६ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ३६ केसेस करण्यात आले आहे.

(पो.नि.एस.के चव्हाण )
**नियत्रण कक्ष अधीकारी भंडारा**
दुरध्वनी.क्र. ९८२३६४७०६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.